पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:
(१) स्त्रीरोग तज्ञ - ०७ पदे, (२) बालरोग तज्ञ - ०७ पदे, (३) भुलतज्ञ - ०७ पदे, (४) फिजिशियन - ०७ पदे, (५) रेडिओलॉजिस्ट - ०१ पद, (६) नेत्रतज्ञ - ०१ पद, (७) वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) - १४ पदे, (८) वैद्यकिय अधिकारी (बी.ए.एम.एस.) – २६ पदे, (९) निवासी वैद्यकिय अधिकारी - १४ पदे, (१०) दंतशल्य चिकित्सक - ३० पदे, (११) फार्मासिस्ट - १६ पदे (१२) स्टाफनर्स - ६५ पदे, (१३) लॅब टेक्निशियन - २२ पदे, (१४) एक्स रे टेक्निशियन - ०१ पद, (१५) सफाई सेवक (महिला) - ३५ पदे भरावयाची आहेत.

वरीलप्रमाणे नमुद संवर्गातील पदे भरणेबाबतची सविस्तर जाहिरात, अर्हता, आरक्षणाचा तपशील, अटी शर्ती तसेच त्याअनुषंगाने इतर सर्व आवश्यक माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर असणाऱ्या "आमच्याविषयी" (About) मध्ये "नोकरीविषयक" (Recruitment) या सदरामध्ये उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी जाहिरात व विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करुन घ्यावा व महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ठेवणेत आलेल्या पेटीमध्ये दि. १५-१२-२०२० अखेर स. १०.०० ते दु. ०४.०० या वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह पुर्णपणे भरलेला आपला अर्ज दाखल करावा. महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य मार्गाने उपलब्ध होणाऱ्या माहितीचे आधारे वैद्यकिय विभागामध्ये चौकशी करु नये.

सही/-
(संतोष पाटील)
अति.आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक -
संकेतस्थळ - www.pcmcindia.gov.in
क्र. वैद्य/१७/कावि/२३६/२०२०
दि. ०७-१२-२०२०

(डॉ.लक्ष्मण गोफणे)
सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण तपशील व अटी - शर्ती खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. व स्त्रीरोग विषयातील पदवी (एम.डी. / एम.एस. / डी.एन.बी.) किंवा पदविका<br>२) शासकिय, निमशासकिय, खाजगी रुग्णालयातील स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र विषयातील किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | ०७ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| २ | बालरोग तज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / डी.एन.बी. (बालरोग) ही पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण<br>२) शासकिय / निमशासकिय / खाजगी रुग्णालयातील किमान ५ वर्षाचा अनुभव<br>३) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | ०७ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| ३ | भुलतज्ञ | १) सांविधिक विद्यापीठाची एम.डी. / डी.एन.बी. (ॲनेस्थेशिया) पदवी<br>२) तत्सम पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असल्यास त्याला प्राधान्य<br>३) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | ०७ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| ४ | फिजिशियन | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / डी.एन.बी. (जनरल मेडिसीन) ही पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण<br>२) शासकिय / निमशासकिय / खाजगी रुग्णालयातील किमान ५ वर्षाचा अनुभव<br>३) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | ०७ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | क्ष-किरण शास्त्रज्ञ (रेडिओलॉजिस्ट) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील रेडीओलॉजी विषयातील एम.डी. / डी.एन.बी. पदवीधारक आवश्यक<br>२) सदरहू कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) इंडियन मेडीकल कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | १ | |
| ६ | नेत्रतज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील नेत्र विषयातील एम.डी. / एम.एस. / डी.एन.बी. ही पदव्युत्तर पदवी किंवा डी.ओ.एम.एस. पदव्युत्तर पदविका आवश्यक<br>२) शासकिय, निमशासकिय, खाजगी रुग्णालयातील नेत्र विषयातील किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | १ | |
| ७ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. पदवी आवश्यक<br>२) इंडियन मेडील कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक | १४ | अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>इमाव ०३<br>एसईबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०३ |
| ८ | वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.ए.एम.एस. पदवी आवश्यक<br>२) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन कडील नोंदणी आवश्यक | २६ | अनु.जाती ०३<br>अनु.जमाती ०२<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>भज क ०१<br>इमाव ०५<br>एसईबीसी ०३<br>ईडब्ल्युएस ०३<br>खुला ०७ |
| ९ | निवासी वैद्यकिय अधिकारी | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.ए.एम.एस. पदवी आवश्यक<br>२) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन कडील नोंदणी आवश्यक | १४ | अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>इमाव ०३<br>एसईबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | दंतशल्य चिकित्सक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील दंतशास्त्रातील बी.डी.एस. पदवीधर आवश्यक<br>२) शासकिय, निमशासकिय, खाजगी रुग्णालयात किमान ३ वर्षे दंतशल्य चिकित्सक म्हणुन कामकाजाचा अनुभव आवश्यक<br>३) इंडियन किंवा महाराष्ट्र डेन्टल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन असणे आवश्यक | ३० | अनु.जाती ०४<br>अनु.जमाती ०२<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>भज क ०१<br>विमाप्र ०१<br>इमाव ०५<br>ईएसबीसी ०४<br>ईडब्ल्युएस ०३<br>खुला ०८ |
| ११ | फार्मासिस्ट | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील डी.फार्म. (D.Pharm) / बी.फार्म (B.Pharm) पदवी आवश्यक<br>२) इंडियन / महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक | १६ | अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>इमाव ०३<br>ईएसबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०२<br>खुला ०४ |
| १२ | स्टाफनर्स | १) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील बी.एस्सी. नर्सिंग अथवा जी.एन.एम. शिक्षणक्रम पुर्ण<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक | ६५ | अनु.जाती ०८<br>अनु.जमाती ०५<br>विजा अ ०२<br>भज ब ०१<br>भज क ०३<br>भज ड ०१<br>विमाप्र ०१<br>इमाव १२<br>एसईबीसी ०८<br>ईडब्ल्युएस ०७<br>खुला १७ |
| १३ | लॅब टेक्निशियन | ३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. ही पदवी आवश्यक<br>४) शासनमान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी. कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक | २२ | अनु.जाती ०३<br>अनु.जमाती ०२<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>इमाव ०४<br>एसईबीसी ०३<br>ईडब्ल्युएस ०२<br>खुला ०६ |
| १४ | एक्स रे टेक्निशियन | ३) भौतिकशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.एस्सी. शाखेची पदवी आवश्यक<br>४) शासनमान्यताप्राप्त संस्थेकडील एक्स-रे टेक्निशियन या विषयातील एक्स-रे टेक्निशियन कोर्स आवश्यक | ०१ | |
| १५ | सफाई सेवक (महिला) | ३) इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४) शारीरिक कष्टाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक | ३५ | |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर तांत्रिक संवर्गातील पदांना शैक्षणिक अर्हता, प्रचलित किमान वेतन दर व शासन निर्णय विचारात घेऊन खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल:

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | मानधन दरमहा र.रु |
|---|---|---|
| वैद्यकिय अधिकारी | एम.बी.बी.एस. | ७५,०००/- |
| तज्ञ वैद्यकिय अधिकारी | एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदवी / पदविका | ८५,०००/- |
| वैद्यकिय अधिकारी / निवासी वैद्यकिय अधिकारी | बी.ए.एम.एस. | ५०,०००/- |
| दंतशल्य चिकित्सक | दंतशल्य चिकित्सक | ५०,०००/- |
| फार्मासिस्ट, स्टाफनर्स, लॅब टेक्निशियन, एक्स रे टेक्निशियन | अ.क्र. ११ ते १४ मधील नमूद पदे | २३,३००/- |
| सफाई सेवक (महिला) | अ.क्र. १५ मधील नमूद पद | २०,३००/- |

टिप -

१. प्रस्तुतचे जाहिरातीनुसार पदे भरणेकरीता दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये एसईबीसी या आरक्षणाचा समावेश आहे. तथापि सदर आरक्षणाबाबत शासनाचे अथवा मा.सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत, एसईबीसी प्रवर्गातील पदे भरणेत येणार नाहीत.

२. तज्ञ वैद्यकिय अधिकारी या संवर्गाकरीता नमूद केलेल्या अर्हतेमध्ये आवश्यकतेनुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास शैक्षणिक तसेच अनुभव अर्हता शिथिल करण्यात येईल.

३. सर्व इच्छुक उमेदवारांना स्पष्टपणे सुचित करण्यात येते की, वरीलप्रमाणे नमूद केलेल्या पदांपैकी काही पदे ही महानगरपालिकेमार्फत कोवीड१९ चे रुग्णांकरीता सुरु करण्यात आलेल्या DCHC (Dedicated Covid Health Centre) व DCH (Dedicated Covid Hospital) येथील आहेत. या ठिकाणी कामकाज करणे उमेदवारांना बंधनकारक राहिल.

४. कोवीड१९ प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर लेखी परिक्षांचे आयोजन करणे शक्य नसल्याने, प्रस्तुत जाहिरातीनुसार उमेदवाराने सादर केलेले अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांचे आधारे संबंधित उमेदवारांची निवड यादी तयार केली जाणार आहे. याकरिता वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेमधील शेवटच्या वर्षातील गुणपत्रकावरील गुण विचारात घेऊन उमेदवाराची गुणानुक्रम यादी तयार करण्यात येईल व त्याप्रमाणे उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणेत येईल.

५. अ.क्र. ०१ ते १४ मध्ये नमूद पदांकरीता शैक्षणिक अर्हतेनुसार शेवटच्या वर्षातील गुणपत्रिका विचारात घेऊन, त्याआधारे गुणानुक्रम यादी तयार केली जाणार आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी त्यांचे गुणपत्रक सादर करणे बंधनकारक आहे. एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस. अर्हताधारक उमेदवारांची त्यांचे ०४ वर्षाचे गुणपत्रक सादर करावे. अ.क्र. १५ मध्ये नमूद पदाकरीता अलहिदा निर्णय घेणेत येईल.

६. उमेदवारांची निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कोणत्याही स्तरावर / कागदपत्रांच्या छाननीमध्ये उमेदवार पात्र नसल्याचे आढळून आल्यास, संबंधित उमेदवार निवडीकरीता / नियुक्तीकरीता अपात्र राहिल.

७. प्रस्तुतचे जाहिरातीनुसार नियुक्त केल्या जाणाऱ्या उमेदवारांना कोवीड१९ नियंत्रणाकामी क्षेत्रीय तसेच रुग्णालयीन कामकाज करणे देखील बंधनकारक राहिल.

.. ५ ..

८. प्रस्तुतच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास महानगरपालिकेमधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

९. ज्या दिवशी महानगरपालिकेस सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

१०. उपरोक्त पदांकरीता उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडणेत आलेला आहे. अर्ज करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्यासोबत स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट आकाराचा १ फोटो, जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती (उदा. गुणपत्रिका (मार्कशीट), सर्टिफिकेट, अनुभव प्रमाणपत्र, जातीचा दाखला तसेच संबंधित राज्य नोंदणी कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी / नुतनीकरण प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे) सादर करणे बंधनकारक आहे.

११. निवड केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

१२. वरील पदांकरीता महाराष्ट्र राज्य आरक्षण कायदा २००४ लागू राहिल. तथापि जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या आरक्षणानुसार आवश्यक उमेदवार उपलब्ध न झाल्यास, वैद्यकिय अत्यावश्यक सेवेचा विचार करुन सदरची पदे रिक्त न ठेवता गुणानुक्रम यादीमधील पुढील उमेदवारांना संधी देण्याबाबत विचार केला जाईल. तथापि सदरची पदे रिक्त ठेवणे अथवा उमेदवारांची नेमणुक करणेबाबतचे संपुर्ण अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांनी राखून ठेवलेले आहेत.

१३. कोरोना (कोवीड१९) विषाणूच्या संसर्गाचे पार्श्वभूमीवर वय वर्षे ५० पूर्ण असणाऱ्या उमेदवारांनी उपरोक्त नमूद पदांसाठी अर्ज करुन नयेत, असे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१४. सदर उमेदवारांना महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असणाऱ्या दवाखाना / रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल. तथापि, नेमून दिलेल्या दवाखाना / रुग्णालयामध्ये आवश्यकता नसलेस अन्य ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार अन्य रुग्णालये / दवाखान्यांमध्ये कामकाज करावे लागेल.

१५. सफाई सेवक या पदावरील महिला उमेदवारांना उमेदवारांना रुग्णालयीन कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक राहिल तसेच दवाखाना / रुग्णालयामध्ये शौचालय साफसफाईचे कामकाज करणे बंधनकारक राहील.

१६. प्रस्तुतचे जाहिरातीमधील पदांकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहिरातीसोबत उपलब्ध करुन देणेत आलेला आहे. सदरचा अर्ज उपलब्ध करुन घेऊन उमेदवाराने सादर करणे अपेक्षित आहे. याकरीता महापालिकेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१७. अ.क्र. १ ते १५ वरील नमूद केलेल्या अर्हताधारक इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि. १४-१२-२०२० अखेर स. १०.०० ते दु. ४.०० या वेळेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, पिंपरी ४११०१८ येथे महापालिका मुख्य कार्यालयाचे प्रवेशद्वाराजवळ ठेवणेत आलेल्या पेटीमध्ये जमा करावेत. कार्यालयामध्ये समक्ष अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

.. ६ ..

१८. सदर नेमणूकीच्या अनुषंगाने गुणानुक्रम यादी तसेच अंतिम निवड यादी, नेमणूक आदेश महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जातील. ते संबंधित उमेदवारांनी उपलब्ध करुन घेऊन मुदतीत वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ येथे रुजू व्हावयाचे आहे. याकरीता कोणत्याही उमेदवारास स्वतंत्रपणे पत्रव्यवहार, दूरध्वनी, मोबाईल, अथवा sms द्वारे संपर्क करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि. १४-०१-२०१० चे शासन निर्णयानुसार पुर्ननियुक्ती न देणेबाबत निर्देश प्राप्त आहेत. त्यामुळे वरील जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांवर महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत मानधनावर कार्यरत असणाऱ्या उमेदवारांच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तथापि वरीलप्रमाणे नमूद पदांकरीता आवश्यकतेएवढे उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकिय अत्यावश्यक सेवेची गरज व कोवीड१९ चे कामकाजाकरीता अपवादात्मक परिस्थितीत उमेदवारांचा पुर्ननियुक्तीकरीता विचार करणेत येईल. तथापि उमेदवारांना पुर्ननेमणुक देण्याचा / नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवलेला आहे.

२०. वरीलप्रमाणे नमूद केलेल्या पदांकरीता आवश्यकतेएवढे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे walk in interview द्वारे भरणेत येतील.

२१. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

सही/-
(संतोष पाटील)
अति.आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

क्र. वैद्य/१७/कावि/२३६/२०२०
दि. ०७-१२-२०२०

सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

# <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

फोटो

**प्रति,**

**मा. आयुक्त.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय - करार/कंत्राटी/मानधन पध्दतीने भरावयाच्या ------------------------ या पदासाठी अर्ज**
**संदर्भ - वैद्यकिय विभागाकडील जाहिरात दि. - -२०२० रोजीची जाहिरात**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालय / दवाखान्यामध्ये करार / कंत्राटी / मानधन पध्दतीने भरावयाच्या --------------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

| अ.क्र. | तपशील | माहिती | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | आडनाव | | | नाव | | | | वडील / पतीचे नाव | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | | | | | | | | |
| ३ | ई-मेल | | | | | मोबाईल क्र. | | | | | |
| ४ | जन्मतारीख | | | | | | | | | | |
| ५ | लिंग | पुरुष | | | स्त्री | | | | | | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | | | | | होय / नाही | | | | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | | | | पदनाम - | | | | | |
| ७ | जात - | | | | जातीचा प्रवर्ग - | | | | | | |
| | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | | |
| ८ | शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | | | | | | | | | |
| | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | | | मिळालेले गुण | | | | टक्केवारी | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| ९ | तांत्रिक व इतर अर्हता तपशील | | | | | | | | | | |
| १० | अनुभवाचा तपशील | | | | | | | | | | |
| | अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | | | | | | पदनाम | | कालावधी | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ६ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. तसेच सद्यस्थितीत मी या महापालिकेमध्ये मानधन स्वरुपात कार्यरत नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ -** **अर्जदाराची सही -**

**दि. / /२०** **अर्जदाराचे नाव --------------------------------------**

**सहपत्रे -** अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २) अनुभवाची प्रमाणपत्रे ३) जात प्रमाणपत्र
४) अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) इतर कागदपत्रे.